# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:16.02.2026** **वार:सोमवार**

---

1. केंद्रीय अर्थसंकल्पातून विकसित राष्ट्र बनण्याची भारताची आकांक्षा प्रतिबिंबित होत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. इंडिया एआय इम्पॅक्ट समिटचं आज नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
3. मराठी पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची मराठी भाषा मंत्र्यांची घोषणा
4. राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाची यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मोठी शोधमोहीम आणि
5. T-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान सामन्यात भारतीय संघ विजयी, सुपर एट गटात स्थान

**पंतप्रधान**

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून विकसित राष्ट्र बनण्याची भारताची आकांक्षा प्रतिबिंबित होत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते. हा अर्थसंकल्प कोणत्याही दबावातून तयार करण्यात आलेला नाही, तर 'भविष्यासाठी आम्ही तयार आहोत', हा संदेश या अर्थसंकल्पातून दिला आहे, असं ते म्हणाले. उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या बळावर भारताला व्यापार करारांमध्ये ठाम भूमिका घेता आली आणि वाटाघाटी देखील करता आल्या, असं त्यांनी सांगितलं. विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना, खासगी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

**एआय प्रदर्शन**

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या प्रभावासंदर्भातल्या इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो 2026 या प्रदर्शनाचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. इंडिया एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेच्या अनुषंगानं हे पाच दिवसांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे. या प्रदर्शनात ऑस्ट्रेलिया, रशिया, जपानसह 13 देश सहभागी झाले आहेत. प्रदर्शनातल्या 300 दालनांमधून नागरिक, पृथ्वी आणि विकास या संकल्पना मांडल्या जाणार आहेत.

इंडिया एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत आरोग्य, कृषी आणि प्रशासन क्षेत्रातल्या चांगल्या पर्यायांसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा विकास याविषयी चर्चा होणार आहे. दरम्यान, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय कृत्रिम बुद्धीमत्तेच्या नैतिक, समावेशक आणि जबाबदार उपयोगाला प्रोत्साहन देण्यासाठी आज एक देशव्यापी डिजिटल अभियान सुरू करणार आहे. विश्वासार्ह आणि मानव केंद्रित एआय परिसंस्था उभी करण्याप्रतीच्या भारताच्या वचनबद्धतेला बळ देणे हा या अभियानाचा उद्देश आहे.

**रेडिओ किसान दिन-अहिल्यानगर**

15 फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण देशभर रेडिओ किसान दिवस म्हणून साजरा केला जातो. आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रात हा दिवस काल मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ऐकुया त्याबाबतचा वृत्तांत...

**आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रानं किसानवाणी आणि आमचं शेत आमचा परिसर या कृषी विशेष कार्यक्रमांच्या माध्यमातून आकाशवाणी आणि शेतकरी बांधवांच नातं वृद्धिंगत व्हावं या उद्देशानं काल एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण, उल्लेखनीय काम करणाऱ्या, जिल्ह्यातल्या नव्वद प्रगतीशील**

**शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. रेडिओ आजही ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी विश्वासार्ह माहितीचे माध्यम आहे. पेरणी, हवामान अंदाज, पीक संरक्षण, बाजारभाव आणि शासकीय योजना यांची माहिती शेतकऱ्यांना योग्य वेळी रेडिओद्वारे मिळते. शेतकऱ्यांसाठीच्या खास कृषी विशेष कार्यक्रमातून तज्ज्ञांचं मार्गदर्शन, यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव आणि स्थानिक भाषेत दिलेले सल्ले, यामुळे रेडिओ हा शेतकरी आणि शासन यांच्यातील मजबूत दुवा बनला आहे. आधुनिक शेती, सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती, हवामान बदल अशा विषयांवरील मार्गदर्शन, पाणीटंचाई, बदलते हवामान, उत्पादन खर्च आणि बाजारपेठेतील अडचणी यावर उपाय सुचवण्यासाठीदेखील रेडिओ प्रभावी माध्यम आहे. तसंच तरुण पिढीला शेतीकडं आकर्षित करण्यासाठी प्रेरणादायी कथा सांगून नवतंत्रज्ञानाची माहितीही रेडिओवरून दिली जाते. रेडियो आणि शेतकऱ्यांच्या अतूट नात्याचा हा उत्सव काल अहिल्यानगर आकाशवाणीने साजरा केला. आकाशवाणी बातम्यांसाठी अहिल्यानगरहून मनोज सातपुते.**

**<u>महाशिवरात्र</u>**

महाशिवरात्रीनिमित्त काल देशभरातल्या शिव मंदिरांमध्ये पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यातील त्र्यंबकेश्वर, परळीवैजनाथ, घृष्णेश्वर, औंढानागनाथ आणि भीमाशंकर या ज्योतिर्लिंग मंदिरांमध्ये रुद्राभिषेक, महाआरती असे विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. दुरुस्तीच्या कामामुळे भीमाशंकर मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद होतं. अन्य सर्वच शिवमंदिरांमध्ये काल दिवसभर दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. सोलापुरात भीमा आणि सीना नदीच्या संगमावर महाशिवरात्रीनिमित्त संगम आरती करण्यात आली.

**<u>सेवालाल जयंती</u>**

संत सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त काल देशभरात त्यांना अभिवादन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या शासकीय निवासस्थानी सेवालाल महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. राज्यात विविध ठिकाणच्या जिल्हाधिकारी कार्यालयातही सेवालाल महाराजांना अभिवादन करण्यात आलं.

**<u>विश्वमराठी संमेलन-नाशिक</u>**

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाचं चौथं विश्व मराठी संमेलन 27 फेब्रुवारी ते 1 मार्च दरम्यान नाशिकमध्ये होणार आहे. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी काल या संमेलनाचे आयोजक, साहित्यिक, कवी यांच्याबरोबर संयुक्त बैठक घेऊन संमेलनाची रुपरेषा निश्चित केली. सामंत यांच्या हस्ते संमेलनाच्या कार्यालयाचं तसंच संकेतस्थळाचं उद्घाटन करण्यात आलं.

**<u>मधु मंगेश कर्णिक-रत्नागिरी</u>**

राज्य शासनाचा मराठी भाषा विभाग, रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालय आणि कोकण मराठी साहित्य परिषदेनं, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांचा शनिवारी रत्नागिरीत भव्य सत्कार केला. त्या हृद्य सोहळ्याचा वृत्तान्त आमच्या प्रतिनिधीकडून...

**आपल्या 90 पुस्तकांमधून कोकणाच्या लाल मातीचं विविधांगी दर्शन मधु मंगेश कर्णिक यांनी घडवलं. त्यांच्या साहित्यसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या सोहळ्याला संपूर्ण कोकणातले रसिक, तसंच साहित्य संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, अशोक बागवे, अरुण म्हात्रे यांच्यासारखे अनेक दिग्गजही उपस्थित होते. सत्काराला भावपूर्ण उत्तर देताना मधुभाई म्हणाले, की अन्य प्रांतांमधल्या साहित्यिक अस्मिता धारदार असल्या, तरी कोकणच्या साहित्यिक अस्मिता सुईसारख्या टोकदार आहेत. सुई शिवण्याचं काम करते, तसंच आम्ही कोकणी लोक सांधण्याचं काम करतो, कोणाचा दुस्वास करत नाही. साहित्यातून एकात्म समाज घडतो. प्रादेशिक अस्मिता असणं पाप नाही; पण सगळ्यांनी महाराष्ट्र एक आहे हे लक्षात ठेवून वागलं, तर वेगळेपणाचे विचार मनात येणार नाहीत. कोमसाप आणि केशवसुत स्मारक ही आपली दोन पुस्तकं अमर आहेत, अशी कृतार्थतेची भावनाही मधुभाईंनी व्यक्त केली. अभ्यासात हुशार नसलेला करूळचा मुलगा साने गुरुजींपासून प्रेरणा घेऊन साहित्यक्षेत्रातलं मोठं व्यक्तिमत्त्व कसा बनला, याचा प्रवासही रसिकांना त्यांच्या मुलाखतीतून अनुभवता आला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला, तरी प्रमाण मराठीच्या शुद्धीकरणाची**

**गरज असून, मराठीच्या पाठ्यपुस्तकांमध्येही मूलभूत बदलांची आवश्यकता असल्याचं परखड प्रतिपादन मधुभाईंनी केलं. यासाठी आवश्यक ती ठोस पावलं उचलण्याचं आश्वासन मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी दिलं. कोकणाची लाल माती म्हणजे काय हे जगाला दाखवण्याचं काम मधुभाईंनी केलं, असा गौरव करतानाच मराठी पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना, परदेशातल्या मराठी नागरिकांच्या पुढच्या पिढीसाठी ऑनलाइन मराठी शिकवणारा कोर्स, केशवसुत स्मारकाचं अत्याधुनिकीकरण अशा घोषणा सामंत यांनी या वेळी केल्या. एकंदरीतच हा सोहळा मराठी साहित्याबद्दल एक आश्वासक नवी दिशा देणारा ठरला. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**<u>एटीएसछापे</u>**

राज्याच्या दहशतवादविरोधी पथकानं काल यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात मोठी शोधमोहीम राबवली. दहशतवादाशी संबंधित काही कारवाया या भागात सुरू असल्याची माहिती गुप्तचर विभागाला मिळाली होती. त्यानुसार तपास पथकानं 20 ठिकाणी धाडी टाकून अनेक लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं. यावेळी अधिकाऱ्यांनी संशयास्पद कागदपत्रं, मोबाइल फोन आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणं ताब्यात घेतली.

**<u>महिलाक्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघांमधला वीस षटकांचा सामना काल भारतीय महिलांनी 9 गडी राखून जिंकला. प्रथम फलंदाजी करताना यजमान ऑस्ट्रेलियाच्या संघानं 18 षटकांत 133 धावा केल्या. भारताच्या 5 षटकांत 50 धावा झालेल्या असताना पावसामुळे खेळ थांबवावा लागला. डकवर्थ लुइस नियमानुसार अपेक्षित 29 धावांपेक्षा भारताची धावसंख्या जास्तच होती. त्यामुळे भारतीय महिला संघ विजयी झाल्याचं घोषित करण्यात आलं.

**<u>क्रिकेट-भारत-पाक</u>**

कोलंबो इथं काल झालेल्या वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट सामन्यात भारतानं पाकिस्तानचा 61 धावांनी पराभव करत सुपर एट गटात प्रवेश केला आहे. या विजयाने आतापर्यंत खेळल्या गेलेल्या वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानवर 9 सामन्यापैकी 8 सामन्यात मात केली आहे. कालच्या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाल्याने भारताची सुरुवात वाईट झाली होती. परंतु ईशान किशनने 40 चेंडूत केलेल्या 77 धावांच्या जोरावर भारताने 175  धावा केल्या. पाकिस्तानचा पहिला फलंदाज संघाची धावसंख्या शून्य असताना बाद झाला. हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करत सुरुवातीलाच पाकिस्तानला धक्का दिला. पाकिस्तानचा संघ 114 धावांत बाद झाला. ईशान किशनला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं. भारताचा पुढील सामना 18 फेब्रुवारीला नेदरलँडसविरुद्ध होणार आहे.

**<u>हवामान</u>**

कोकणात तुरळक ठिकाणी आज हवामान उष्ण आणि दमट असेल. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.